दि. 07/082019

प्रेस नोट

नाशिक शहरातील विद्यार्थ्यांसाठी स्मार्ट सिटीचं पाऊल

स्मार्ट सिटी नाशिकच्या वतीने शहरातील इंजिनिअरींग आणि आर्किटेक्ट कॉलेजचे प्राचार्य, विभाग प्रमुख, प्राध्यापक यांच्यासोबत स्मार्ट सिटीबाबतच्या प्रकल्पांसंदर्भात नॉलेज शेअरींग वर्कशॉप घेण्यात आला. स्मार्ट सिटी मार्फत होत असलेल्या प्रकल्पांमध्ये नाशिककरांचा उत्स्फूर्त सहभाग असावा या हेतूने स्मार्ट सिटी नाशिक अंतर्गत अनेक कामे होत आहेत. त्यातील काही प्रकल्पांमध्ये इंजिनिअरींग, आर्किटेक्ट, अॅग्रीकल्चर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संधी मिळावी, याहेतूने दिनांक 7 ऑगस्ट, 2019 रोजी स्मार्ट सिटी आणि शहरातील काही निवडक आणि नामांकीत इंजिनिअरींग, आर्किटेक्ट आणि अॅग्रीकल्चर कॉलेजचे प्राचार्य, विभागप्रमुख आणि प्राध्यापकांसोबत नॉलेज शेअरींग वर्कशॉप घेण्यात आला.

स्मार्ट सिटीच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी मा. साो. प्रकाश थविल यांनी स्मार्ट सिटीविषयीची संकल्पना आणि उद्देश समजावून सांगितला. त्याचबरोबर मा. श्री विश्राम पाटील साो. जनरल मॅनेजर सिव्हील, मा. श्री. साो. प्रमोद गुर्जर जनरल मॅनेजर आयटी आणि वरिष्ठ नगररचनाकार मा. सौ. कांचन बोधले यांनी स्मार्ट सिटी अंतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पांचे महत्त्व विषद केले. त्याचबरोबर स्मार्ट सिटी अंतर्गत होत असलेल्या 57 प्रकल्पांबाबत उपस्थितांना माहिती देण्यात आली. पूर्ण झालेले प्रकल्प, सुरू असलेले प्रकल्प आणि होऊ घातलेल्या प्रकल्पांबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी गोदा रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट आणि गोदा ब्युटीफीकेशन,स्मार्ट रोड, ABD(एरिया बेस डेव्हलपमेंट), स्मार्ट पार्किंग, ग्रीन फिल्ड, पब्लिक बायसिकल शेअरिंग या आणि स्मार्ट सिटीच्या इतर प्रकल्पांबाबत यावेळी सविस्तर चर्चा झाली आणि उपस्थित मान्यवरांनी काही सूचना मांडल्या. त्या सूचनांचा विचार स्मार्ट सिटी सकारात्मकपणे करत आहे.

सदर आणि यासारखे अनेक उपक्रम स्मार्ट सिटी राबवत आहे आणि राबवणार आहे. या नाशिक स्मार्ट होताना नाशिककरांचा त्यात उत्स्फूर्त प्रतिसाद महत्त्वाचा आहे. त्यादृष्टीने स्मार्ट सिटी प्रयत्न करत आहे. आणि आपआपल्या क्षेत्रात नामवंत असलेल्या नागरिकांना आणि नाशिककरांना स्मार्ट सिटीमार्फत आवाहन करण्यात येत आहे. आपल्या सूचनांचा अवश्य विचार करण्यात येईल. स्मार्ट सिटी नाशिककरांसाठीच होत असताना त्यांचा उत्स्फूर्त सहभाग फार महत्त्वाचा आहे.

सदर नॉलेज शेअरींग वर्कशॉपमध्ये नाशिक शहरातील इंजिनिअरींग कॉलेजेस, आर्किटेक्ट कॉलेजेस आणि अॅग्रीकल्चर कॉलेजेसचे प्राचार्य, प्राध्यापक, आणि काही कॉलेजेसचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. दरम्यान, यापुढील काळात संबंधित महाविद्यालयांसोबत संपर्कात राहून त्यांच्या विद्यार्थ्यांना स्मार्ट सिटीच्या प्रकल्पांमध्ये

प्रत्यक्ष कामाचा अनुभव देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जनसंपर्क अधिकारी प्रशांत चिडे यांनी केले. तर मा. श्री विश्राम पाटील साो. जनरल मॅनेजर सिव्हील यांनी आभारप्रदर्शन केले. सदर नॉलेज शेअरींग वर्कशॉपच्या यशस्वीतेसाठी स्मार्टी सिटी कंपनीच्या सर्व अधिकारी, पदाधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

जनसंपर्क विभाग,

नाशिक म्युनिसिपल स्मार्ट सिटी

डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.